# रुरल फौन्डेशन नंदुरबार संचलित

वरिष्ठ विज्ञान महाविद्यालय अक्कलकुवा जि. नंदुरबार

**(उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव सलग्नीत)**

# अनुबंध

२०१८-१९



# रुरल फौन्डेशन नंदुरबार संचलित

वरिष्ठ विज्ञान महाविद्यालय अक्कलकुवा जि. नंदुरबार

**(उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव सलग्नीत)**

# अनुबंध

२०१८ – २०१९

**प्रमुख संपादक**

प्रा. गोटू के. सूर्यवंशी

# अनुबंध

२०१८– २०१९

## प्रकाशक

प्राचार्य डॉ. एम.जी.रघुवंशी

## संपादक

प्रा. जी.के. सूर्यवंशी

## मुद्रक

प्रो. ज्ञानेश्वर . एस. चौधरी न्यू लकी प्रिंटिंग प्रेसअक्कलकुवा -
४२५४१५
जि. नंदुरबार

# आमचे प्रेरणास्थान



## मा.आप्पासाहेब प्रकाश बी. पाटील
## संस्थापक

## Vision

- **Integrate career preparation with the traditional courses.**
- **To educate the students of tribal and rural area.**
- **Promote every student participation for nation building through social and affordable education.**
- **Support students to face competitive world**.

## Mission

- **To impart the higher education to the students of tribal and rural area.**
- **Thereby achieve excellence.**
- **To give back a value of society what we have gained from it.**
- **Impart knowledge in a conceptually sound and applied manner.**
- **Develop the skills, competencies and attitudes which are required in the present knowledge society.**
- **Nurture social value develops socially committed professional and contributors for nation building.**

## Objectives

- **To provide qualitative education to the students in different disciplines.**
- **To guide the students for all round development of their personalities.**
- **To motivate the students for participation in co-curricular and extra-curricular activities.**
- **To create the awareness of social responsibility among the students.**
- **To motivate the tribal and rural students towards competitive examination.**
- **To create cultural and nation loving citizens.**
- **To commit the students to maintain ecological balance and to enable students to guide the masses in the field of water harvesting and tree plantation.**
- **To inform students about present needs of the nation and prepare them for lead the nation.**
- **Create balance between education and social value.**

## स्थानिक व्यवस्थापन समिती

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री. प्रकाश बी. पाटील | अध्यक्ष |
| २ | श्री. ब्रिजलाल पी. पाटील | सदस्य |
| ३ | सौ. मंगलाबेन पी. पाटील | सदस्या |
| ४ | प्रा. योगेश आण्णा दुशिंग | सदस्य |
| ५ | प्रा. विजय शिवाजी पाटील | सदस्य |
| ६ | प्रा. अंकुश चिंतामनराव खोब्रागडे | सदस्य |
| ७ | श्री. योगेश व्ही. कुलकर्णी | सदस्य |
| ८ | श्री. मगन पी. चौधरी | सदस्य |
| ९ | श्री. योगेश एम. महाजन | सदस्य |
| १० | श्री. प्राचार्य एम.जी.रघुवंशी | मा.सचिव |

## माहिती अधिकार समिती

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ.एम.जी.रघुवंशी | प्राचार्य |
| २ | श्री. योगेश एम. महाजन | कार्यालयीन अधीक्षक |

# IQAC समिती

| अ.न. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | प्रा. डॉ. योगेश आण्णा दुशिंग | अध्यक्ष |
| २ | प्रा. डॉ. भरत नगिन पाटील | सदस्य |
| ३ | प्रा. डॉ. विजय शिवाजी पाटील | सदस्य |
| ४ | प्रा. डॉ. मोहमदजुबेर शेख उस्मान | सदस्य |
| ५ | प्रा. अंकुश चिंतामणराव खोब्रागडे | सदस्य |
| ६ | प्रा. राजेश्वरसिंग सरदारसिंग पाडवी | सदस्य |

## परीक्षा समिती

| अ.न. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | प्रा. डॉ. योगेश आण्णा दुशिंग | अध्यक्ष |
| २ | प्रा. गोपाल एम. शेंडे | सदस्य |
| ३ | प्रा. अंकुश चिंतामणराव खोब्रागडे | सदस्य |
| ४ | श्री. कांतीलाल पाटील | सदस्य |
| ५ | श्री. संदीप पी. पाटील | सदस्य |
| ६ | श्री. नारायण आर. पाटील | सदस्य |

## प्राद्यापक वर्ग

| अ.न. | प्राध्यापकाचे नाव | पद | शै. पात्रता |
|---|---|---|---|
| १ | डॉ. एम.जी.रघुवंशी | प्राचार्य | एम.एस्सी. एम. फील. पी.एचडी. |
| २ | प्रा. डॉ. भरत नगिन पाटील | सहाय्यक प्राध्यापक | एम.एस्सी. पी.एचडी. |
| ३ | प्रा. डॉ. विजय शिवाजी पाटील | सहाय्यक प्राध्यापक | एम.एस्सी. पी.एचडी. |
| ४ | प्रा. राजेश्वरसिंगसरदारसिंग पाडवी | सहाय्यक प्राध्यापक | एम.एस्सी. नेट |
| ५ | प्रा. गोपाल एम. शेंडे | सहाय्यक प्राध्यापक | एम.एस्सी. सेट |
| ६ | प्रा. मनोज एम. मुधोळकर | सहाय्यक प्राध्यापक | एम.ए. एम.फील. नेट/सेट |
| ७ | प्रा. अंकुश चिंतामणरावखोब्रागडे | सहाय्यक प्राध्यापक | एम.ए. एम.फील. नेट |
| ८ | प्रा. डॉ. मोहमदजुबेर शेख उस्मान | सहाय्यक प्राध्यापक | एम.एस्सी. पी.एचडी. |
| ९ | प्रा. डॉ. योगेश आण्णादुशिंग | सहाय्यक प्राध्यापक | एम.एस्सी. पी.एचडी. |
| १० | प्रा. डॉ.विनोद आर. जोगदंड | सहाय्यक प्राध्यापक | एम.एस्सी. पी.एचडी. |
| ११ | प्रा. विनिश चंद्रन | क्रीडा संचालक | एम.पी.एड. नेट |
| १२ | प्रा. गोटू के. सूर्यवंशी | ग्रंथपाल | एम.लिब. सेट |

## शिक्षेकेत्तर कर्मचारी

| अ. क्र. | नाव | पद | शै. पात्रता |
|---|---|---|---|
| १ | श्री. योगेश एम . महाजन | मुख्य लिपिक | एम.ए. |
| २ | श्री. कांतीलाल एन. पाटील | प्रयोगशाळा सहाय्यक | बी.एस्सी . |
| ३ | श्री. जगदीश एन. पाटील | वरिष्ठ लिपिक | एम.ए. |
| ४ | श्री. संदीप पी. पाटील | कनिष्ठ लिपिक | बी.एस्सी . |
| ५ | श्री. प्रशांत आर. पिंपरे | प्रयोगशाळा परिचर | १० वी . |
| ६ | श्री. मनीष आर. पटेल | प्रयोगशाळा परिचर | बी. लिब. |
| ७ | श्री. भगवान आर. पाटील | शिपाई | १२ वी. |
| ८ | श्री. नारायण आर. पाटील | शिपाई | १२ वी. |
| ९ | श्री. भरत एन. साळवे | शिपाई | १२ वी. |
| १० | श्री. अंकुश जे. ठाकरे | प्रयोगशाळा परिचर | १२ वी. |
| ११ | श्री. दिनेश एम. ईशी | प्रयोगशाळा परिचर | १२ वी. |

## प्राचार्यांचे मनोगत

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चा वार्षिक अंक वाचकप्रिय करण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी हे महत्त्वाची भूमिका बजावत असतात. आपल्या महाविद्यालयातील आपल्या महाविद्यालयात विविध मंडळामार्फत नवनवीन उपक्रम घेतले जातात. त्यातून विद्यार्थ्यांच्या मनात जिज्ञासा निर्माण होऊन नवीन काहीतरी निर्माण किंवा ते सादर करण्याची क्षमता निर्माण होते. विद्यार्थी हे प्रयत्न त्यांच्यात असलेल्या सुलेखनाच्या माध्यमातून व्यक्त करण्याचा प्रयत्न करत असतात.

आमचे महाविद्यालय हे आदिवासी भागात असल्याने येथे विद्यार्थ्या विद्यार्थ्याला स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी सक्षम पणे उभ राहण्यासाठी महाविद्यालयात विविध उपक्रमम राबविले जातात. त्यातून विद्यार्थी सर्वांगीण विकास महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग सतत क्रियाशील आणि अद्यावत जगाशी जोडलेले जोडलेला असल्यामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक आलेख उंचावला आहे. विद्यापीठ पातळीवर उत्कृष्ट स्वयंसेवक तसेच राज्य पातळीवर देखील आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी राज्य पुरस्कार प्राप्त केला आहे. प्राध्यापक संशोधन कार्य असो अथवा विविध कार्यशाळांच्या आयोजन या साऱ्यांचा परिणाम महाविद्यालयाच्या विकासावर आणि विद्यार्थी वर्गाचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासावर होतो. आपल्या संस्थेच्या संचालक मंडळा मंडळ चांगल्या कामासाठी सतत पाठिंबा असल्यामुळे माझे सहकारी हे करू शकले. अंक दर्जेदार होण्यासाठी संपादक मंडळांनी घेतलेल्या परिश्रमाचे या ठिकाणी मी आभार व्यक्त करतो धन्यवाद.

**धन्यवाद**

## संपादकीय

संपादकीय प्रिय विद्यार्थी मित्रांनो आपल्या महाविद्यालयात वार्षिक नियतकालिक प्रकाशित करण्यामागचा एकच उद्देश असतो, की महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास या आधारावर प्रकाशित केला जातो. सदर नियतकालिकेत विद्यार्थ्यांकडून विविध विषयांवर कविता मागवले जातात, आणि ते नियतकालिकेत संपादित करून प्रकाशित करण्याचा एक छोटासा महाविद्यालयाडून केलेला प्रयत्न असतो.

संपादक या नात्याने सदर नियतकालिक संपादित करत असताना विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या विविध विषयांवरील कविता चारोळी लेख हे त्या विद्यार्थ्यांमधील असलेले सुप्त गुण तसेच त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आव्हान करतो की, त्यांनी त्यांच्या मनात असलेली क्रिएटिव्हिटी या नियतकालिकेद्वारा प्रकाशित करून त्यांच्यात असलेले सुप्त गुण समाजासमोर येण्यास अतिशय महत्त्वाची भूमिका या नियतकालिकेद्वारे सादर केली जाते.

**धन्यवाद**

| क्र. | अनुक्रमणिका | पृष्ठांक |
|---|---|---|
| १ | भेटी गाठी | १४ |
| २ | पाऊस तू अन कविता | १५ |
| ३ | वुमन्स डे | १६ |
| ४ | तिच्या समोरील पाने | १७ |
| ५ | दिलातील जळजळ | १८ |
| ६ | पाऊस बनून जावं | १९ |
| ७ | तू फक्त भेट तिला एकदा किनारा बनून | २० |
| ८ | जडलेले बाबा न पडलेली आई | २१ |
| ९ | सारेच तारे | २२ |
| १० | या वांझोट्या रात्रीला कधी चंद्र जन्म देतो | २३ |
| ११ | आवर्तन | २४ |
| १२ | दोन डोळे | २५ |
| १३ | चारोळया | २६ |
| १४ | चारोळया | २७ |
| १५ | जीवन के मूल्य | २९ |
| १६ | बेटीया | ३० |
| १७ | रंग | ३१ |
| १८ | वीरो का कैसा हो वसंत | ३२ |
| १९ | कलम आज उनकी जय बोल | ३३ |
| २० | ओ गगन के झगमग आते दीप | ३४ |
| २१ | पुष्प की अभिलाषा | ३५ |
| २२ | ज्ञान का खजिना | ३६ |
| २३ | युवाशक्ती | ३७ |
| २४ | रंग बरस रहे है | ३८ |
| २५ | The road not taken | ४० |
| २६ | O Captain my captain | ४१ |
| २७ | Language | ४२ |
| २८ | Happy college student | ४३ |
| २९ | Congratulations | ४४ |

# मराठी कविता

# भेटीगाठी

रात ठिबकते साथ देऊनी उनाड तळयाकाठी
त्याच किनारी ठरल्या होत्या आपल्या भेटीगाठी
गंध माळूनी नक्षत्रांचा फुलली राने आहेत
माझी म्हणाया रितेपणात या माझी पाने आहेत
लख्ख पडल्या चंद्रप्रकाशात ही रात धूसर भासते
लागोलाग उठल्या वलयांमध्ये तुझी सावली दिसते
मला भेटाया तळयात उतरले सारे तारे आहेत
माझी म्हणाया रितेपणात या माझी पाने आहेत
धुंद वाहत्या वाऱ्यावरती औदुंबर सळसळते
पायाखालच्या पाचोळयातुन कुठे व्याळ वळवळते
श्वास रोखुनी अंधारातून सावज धावते आहे
माझी म्हणाया रितेपणात या माझी पाने आहेत

**संकलन**
लष्करी नंदिनी
प्रथम वर्ष विज्ञान

# पाऊस तू अन कविता

एक एक थेंब अवकाशातून कोसळताना
एकदा अंगणी उभी राहा
हात पसरवून ते पाणी अंगावर झेल
आठवेल आता तुला
एक एक ओळ माझ्या कवितेची -
ज्या मी सुरवातीला तुझ्यासाठी लिहिल्यात
नाही म्हटल्या तरी आठवणीत राहिल्यात

**संकलन**
माळी शशांक
प्रथम वर्ष विज्ञान

# वूमन्स डे

व्हेंटिलेटरवर ती
इसीजी चा टूनग, टूनग आवाज
उरात भीती, घश्यात अडकलेले श्वास
वातावरणात पसरलेला औषधी वास
“वाचेल का हो ?” -मी
.
व्हेंटिलेटरवर ती -
फाटलेले ओठ , रक्ताळलेल शरीर
असंख्य जखमा घेऊन, खचलेला धीर
तशी ती चुरगळुन बिरगळुन टाकलेली
रस्तावर कचऱ्याच्या ढिगाच्या काठी
पण खरच कुणी नाही आज तिच्या पाठी
.
व्हेंटिलेटरवर ती
“डॉक्टर प्लिज वाचवा ना तिला” -मी
कस घडल? कुणी केल? तू कोणते कपडे घातले होतेस?
किती पिलेली होतीस? वगैरे वगैरे
एक इंटरव्ह्यू पाहिजे मला फक्त
थोडा वेळ बोलली तरी चालेल

**संकलन**
पाडवी खुशमाला
प्रथम वर्ष विज्ञान

# तिच्या समोरील पाने

काल मी तिच्यासमोर ठेवून दिली
मी लिहिलेली काही पाने
मागच्या काही महिन्यात लिहिलेली
तिच्या ओठांवर लिहिलेल्या चारोळ्या
तिच्या पाठीवर लिहिलेल्या कविता
अन तिच्यावर लिहिलेल्या गजला
तिच्या केसांत गुंफलेली त्रिवेणीही होतीच
त्या फक्त ओळी नव्हत्या , प्रत्येक ओळ ती स्वतः होती
कशीही का असेना पण माझी होती
कित्येक मैफिली गाजवल्या होत्या मी
त्या ओळींवर, तिच्या जीवावर
तिने पान उचलले, ती वाचू लागली
माझी नजर तिचे भाव टिपू लागली
तिने हळूच एक भुवई वरती केली
एक उसासा टाकला,
पान खाली ठेवून दिल

**संकलन**
नाईक मोनिका
द्वितीय  वर्ष विज्ञान

# दिलातील जळजळ

घेऊन चला जिथे नभांची हळहळ आहे
ओकायची तिथे दिलातील जळजळ आहे
बरसायचे आहे मुक्त माझ्या जाणिवांना
माझ्या उरात दाटली त्यांची वळवळ आहे
खूप दाटले आहे हे धुके उन्हाळयात
वाटते सावलीत माजली खळबळ आहे
दाही दिशात पळती हे रुधिराचे घोडे
नसानसांत भरली त्यांची चळवळ आहे
नसेल उदयाच्या वेशीला तिमिराचे तोरण
लावलेल्या तिथे दिवट्या ही बळबळ आहे
अथांग सागराला का विचारतात प्रश्न
उत्तरात लपलेली त्याची कळकळ आहे

**संकलन**
वसावे प्रियदर्शनी
द्वितीय  वर्ष विज्ञान

# पाऊस बनून जावं

पाऊसात भिजताना पाऊस बनून जावं
आपण कितीही कोरडे असलो
तरी पाण्यासारख वहाव
वाहून न्याव्यात कधी कागदाच्या बोटी
बरसण्यासाठी मिळतात नाणीही खोटी
कधी असच छोट्या सुखासाठी झगडावं
पाऊसात भिजताना पाऊस बनून जावं
अंगणी चिखल होतो कधी कधी
पण त्यामुळेच बहरतात पेरलेली दाणी
कधी येतो पूर, कधी वाहून जातात गायी
पण समतोलासाठी कधी अस पण करावं
पाऊसात भिजताना पाऊस बनून जावं

**संकलन**
प्रजापती पवन
तृतीय  वर्ष विज्ञान

# तू फक्त भेट तिला एकदा किनारा बनून

तू फक्त भेट तिला किनारा बनून
फिरू दे ना थोड तिला
तुझ्या प्रेमाच्या किनाऱ्यावर,
भिजू दे ना तिला थोड,
त्या तुझ्या बऱ्या वाईट लाटांतुन उडणाऱ्या तुषारांमध्ये,
कळू देत तिला काय देण लागते ती या समुद्राच
भेट तिला एकदा किनारा बनून...
रेखाटू देत तिला ही
तिच्या मनात लपून ठेवलेल्या जखमा
तुझ्या मनाच्या रेतीवर,
पण हो लाटांनी त्या पुसायचा प्रयत्न मात्र नको करुस
मग बघ बांधेल तीही,
तिच्या स्वप्नांचा महल.
तू मात्र शंख शिंपल्यांची आरास करून तिला थोडीफार मदत मात्र कर.

**संकलन**
चव्हाण राहुल
तृतीय वर्ष विज्ञान

# झडलेले बाबा न पडलेली आई

हिम्मत नाही माझ्यात
त्याच्या उरात दाटलेल्या
भाबड्या प्रश्नांना उत्तरे द्यायची
मी तर नेहमीच टाळत असतो
पण गणित, भूमितीचे सोडून तो फालतु प्रश्न जास्त विचारतो
हे असंच का? न ते तसच का?
सगळ्या डोक्याची आईबहीण करून सोडतो
आज जरा शांत होता तो , म्हटल आज तरी सुटलो
तेवढ्यात त्याच्या तोंडाच्या बंदुकीतून एक गोळी सुटलीच
कर्म माझ...
“दादा, ते पान कश्याला पडत झाडावरून” -तो
“सोड रे, पडल झडल तरी पानच ते उगेल परत
उगेल रे दुसर, सोड ना बाबा” -मी
मग झडलेले बाबा न पडलेली आई परत का उगवली नाही?-तो
मी निरुत्तर

**संकलन**
पाडवी भाग्यश्री
तृतीय वर्ष विज्ञान

# सारेच तारे

ढिगाने पडलेत ग तारे, रोज ढिगाने वाढतातही म्हणे
पण त्या ढिगात, तू बरोबर बोट करून कस मलाच ओळखतेस नेहमी?
बहुदा जास्त चमकत असेल ना मी
की तुझ्या डोळयातील आसवे मला पाहून जास्त चमकतात?
इथे एक एक जण खर्ची पडतो
तेंव्हा बहुदा एका ताऱ्याचा जन्म होतो नाही!
की तुम्ही लोकांनीच ही अंधश्रद्धा पाळलीय मनात
मी सांगतोय, मी नाहीय तो तारा
मी काय कुणीच नाहीय कोणता तारा

**संकलन**
वळवी मंगेश
तृतीय  वर्ष विज्ञान

# या वांझोट्या रात्रीला, कधी चंद्र जन्म देतो

या वाझोट्या रात्रीला, कधी चंद्र जन्म देतो
कधी चांदणे सुखाचे, कधी अंधार मर्म देतो
मी पाहिले अंतरीचे, प्रताप कोवळे होते
जो येतो काळजीने, नेहमी तोच दम देतो
तू यातना पाहत होती, मी फुले मोजत होतो
ना भाव भावनांचे झाले, मी विकत कर्म देतो
खूप लावून झाले आमचेच प्रेत टांगणीला
एक थेंबही रक्ताचा काळजावर वर्म देतो
शून्यच नाही उरले आता हिशोब मांडताना
'प्रति' आकडे तुम्हाला कधी सम कधी विषम देतो

**संकलन**
विसपुते प्रियंका
प्रथम  वर्ष विज्ञान

# आवर्तन..

असे आज काही घडावे कशाने
तुझी याद यावी सुचावे तराणे...
कधी गायिलेले तराणे उमटता
अवेळीच यावे भरोनी नभाने...
नभाने करावी धरा चिंब आणि
धरेने नटावे नव्या वैभवाने...
नवे साज ल्यावे, नवे गंध प्यावे
नवे गंध वार्यावत मिसळून जावे..
नवे गंध जावे नभाच्या प्रवासा
नभाला कळावे तुझे गूज त्याने...
नभाने कथावे खुळ्या पश्चिमेला
तिने लाजुनी सप्तरंगात न्हावे...
अशी सांज बघता नुरावेच भान
तुझ्या आठवांनी झुरावेच प्राण...
पुन्हा आज काही घडे हे अशाने
तुझी याद आली नि सुचले तराणे..

**संकलन**
प्रजापती हितेश
प्रथम  वर्ष विज्ञान

# दोन डोळे

सप्तरंग नकळत देऊन जातो उन्हात पाऊस येऊन
बरसणाऱ्या नभात तेंव्हा मज दिसतात दोन डोळे
आभाळाचे काळे अंगण जिथे घालीशी तारे पिंगण
लुकलुकणाऱ्या ताऱ्यात मजला दिसतात दोन डोळे
मज वाटते असे काही जग याहून निराळे नाही
जग विरघळले ज्यात माझे ते दिसतात दोन डोळे
हा भास कि काय जाणण्या मी मिटतो दोन्ही पापण्या
मिटल्या डोळयानाही पण आता दिसतात दोन डोळे
जुळवून कशाशी नाते मन पिसाट मोर होते
गळलेल्या पिसातही मज तेच दिसतात दोन डोळे
प्रीती जयात साचे दर्पण तिच्या अंतराचे
मज वेड लावणारे ते दिसतात दोन डोळे
नका म्हणू गड्यानो सोड वेड माझे मला हे गोड
मी आंधळा प्रेमात तिच्या पण दिसतात दोन डोळे

**संकलन**
पाडवी विश्वास
द्वितीय वर्ष विज्ञान

# चारोळया

1] नातं तुझं नि माझं
तो समुद्र अन् त्या लाटेसारखं
ती उसळून जाते भेटायला त्या किनाऱ्याला
तो जाऊ देत नाही
जसं तू मला तुझ्यापासून दूर राहू देत नाही

2] उघड्या डोळयांचं काय घेऊन बसलास
बंद डोळयांतही स्वप्न बनून तूच दिसतोस
साठवून घ्यावं मनात तुझं माझ्याकडं बघणं
इतकं हरवून माझ्यात...मला तू बघतोस

3] सोबत तू असावंस
चिंब पावसात भिजताना
अन् रोखून नजर तू बघावं
भिजलेल्या मला लाजताना

4] निरखताना तू मंद प्रकाशात
उजळलेला चेहरा माझा लाजरा
तुझ्या सोबत असाच रे माझा
प्रत्येक क्षण साजरा

5] दिसतोस तू मला
मी आरशात मलाच बघताना
कसं जमतं तुला हे माझ्यासोबत असणं ?
सोबत माझ्या नसताना

**संकलन**
पटेल रमाकांत
तृतीय  वर्ष विज्ञान

# चारोळया

1] कुणीतरी हवं मला ओळखणारं
थोडं माझ्याही पेक्षा जास्त
कुणीतरी हवं हरवून जाणारं
माझ्यामध्ये माझ्यासोबतच बिनधास्त

2] मन मोकळं करावं तुझ्याजवळ
बस थोडा सा एकांत हवा
तुलाही जाणवेल हळू हळू मग
एक नवी मी अन् एक तूही नवा

3] जुळली मने जुळल्या कल्पना
ओढ किनाऱ्याची बेभान त्या लाटेला
कळल्या भावना कळल्या वेदना
ही पाऊले सोबत तुझ्या अनोळखी वाटेला

4] नातं..दुराव्यात ही जवळीक जपणारं
गालावरच्या खळीसाठी तिच्या
जसं डोळयातलं पाणी
त्याच्या पापणीआड लपणारं

5] माझ्या मनात रेंगाळणाऱ्या तुझ्या आठवणी
जणू जीवाला वेडावणारा बकुळीचा गंध
ओंजळ सोडून गेली फुले जरी
दरवळणारा माझ्या श्वासात मंद..मंद

**संकलन**
वळवी आकाश
तृतीय वर्ष विज्ञान

# हिन्दी कविताएं

# जीवन के मूल्य

जन्म लिया है तो कुछ तो करके दिखाओ
पढाई कर रहे हो तो कुछ बनके दिखाओ !!
हमारा बरताव ऐसा हो हमपर सबकोनाज  हो
इस जीवन मे आये हो तो!!
कुछ न कुछ तो करके दिखाओ
आपणा स्वार्थ मा बाप को बताना!!
अपनी सारी खुशीयाहुंपेलताना
अपना काम खुद कर्माबापमारेनहीनोकर!!
एक दिन तो हम सबको है मरना
नाम रहे अमर तो हमको कुछ नही करना!!
मंजिल नही मिलती है
जिनके सपनोंमे जान होती है!!
आंखो में कुछ नही होता है
होसलोसेउड्डान होती है!!
अपने को अपने जितना की
जिंदगी कम पड जाये!!
कितना कम हो जाये
कुछ पाना तो किस्मत की!!
कोशिश करो की मंजिल आने पर
मजबूर हो जाये!!
दिल कि मतबनाव कि
तुम कितनी बडी है!!
अपनी तकलीफ को मत बताओ
की तुम कितनी बडी है!!

**संकलन**
खिची प्राची
द्वितीय   वर्ष विज्ञान

# बेटीया

उस की एक बूंद से होती है
बेटीया!
स्पर्श खुर्द राहो तो होती है
बेटिया!
रोशन करेगा बेटा तो एक ही
कुल का!
दोनो इला कुल की लाज होती है बेटिया
कोई नही है दोस्तो एक दुसरे से
कम!
हिरा अगर बेटा तो मोती है
बेटिया!
कटो की राह पार चलती रहेगी
औरो के लिए होती है
बेटिया!
परंपरा अपने को छोडकर जाते है
बेटिया!

**संकलन**
भन्साळी पिंकेश
द्वितीय वर्ष विज्ञान

# रंग

हर रंग में शामिल जो हुआ रंग तेरा हर शय में नज़र
आने लगा अंग तेरा।

आऊँ तो भला कैसे तेरे दिल में सनम ? अफसोस के है
दिल का रस्ता तंग तेरा।

माना के मेरा शौक है अल्फाज़ तेरे, सुनता है जहाँ शौक
सी महंग तेरा।

रूह इश्क़ से महरूम हुआ है तो नहीं। फिर क्यों है सवेरे
से बदन दंग तेरा?

आ जश्न मना ले के मुझे इश्क हुआ। चिराग के हीटी पे
लगा रंग तेरा।

**संकलन**
मिस्तरी शैलेश
द्वितीय वर्ष विज्ञान

# वीरों का कैसा हो वसंत

आ रही हिमालय से पुकार
है उदधि गरजता बार बार
प्राची पश्चिम भू नभ अपार;
सब पूछ रहें हैं दिग-दिगन्त
वीरों का कैसा हो वसंत

फूली सरसों ने दिया रंग
मधु लेकर आ पहुंचा अनंग
वधु वसुधा पुलकित अंग अंग;
है वीर देश में किन्तु कंत
वीरों का कैसा हो वसंत

भर रही कोकिला इधर तान
मारू बाजे पर उधर गान
है रंग और रण का विधान;
मिलने को आए आदि अंत
वीरों का कैसा हो वसंत

गलबाहें हों या कृपाण
चलचितवन हो या धनुषबाण
हो रसविलास या दलितत्राण;
अब यही समस्या है दुरंत
वीरों का कैसा हो वसंत

**संकलन**
जैन सोनम
तृतीय  वर्ष विज्ञान

# कलम, आज उनकी जय बोल

जला अस्थियां बारी-बारी
चिटकाई जिनमें चिंगारी,
जो चढ़ गये पुण्यवेदी पर
लिए बिना गर्दन का मोल
कलम, आज उनकी जय बोल।

जो अगणित लघु दीप हमारे
तूफानों में एक किनारे,
जल-जलाकर बुझ गए किसी दिन
मांगा नहीं स्नेह मुंह खोल
कलम, आज उनकी जय बोल।

पीकर जिनकी लाल शिखाएं
उगल रही सौ लपट दिशाएं,
जिनके सिंहनाद से सहमी
धरती रही अभी तक डोल
कलम, आज उनकी जय बोल।

अंधा चकाचौंध का मारा
क्या जाने इतिहास बेचारा,
साखी हैं उनकी महिमा के
सूर्य चन्द्र भूगोल खगोल
कलम, आज उनकी जय बोल।

**संकलन**
मंडलिक हर्षला
तृतीय  वर्ष विज्ञान

# ओ गगन के जगमगाते दीप!

दीन जीवन के दुलारे
खो गये जो स्वप्न सारे,
ला सकोगे क्या उन्हें फिर खोज हृदय समीप?
ओ गगन के जगमगाते दीप!

यदि न मेरे स्वप्न पाते,
क्यों नहीं तुम खोज लाते
वह घड़ी चिर शान्ति दे जो पहुँच प्राण समीप?
ओ गगन के जगमगाते दीप!

यदि न वह भी मिल रही है,
है कठिन पाना-सही है,
नींद को ही क्यों न लाते खींच पलक समीप?
ओ गगन के जगमगाते दीप!

**संकलन**
जैन सोनम
तृतीय  वर्ष विज्ञान

# पुष्प की अभिलाषा

चाह नहीं, मैं सुरबाला के
गहनों में गूंथा जाऊं,
चाह नहीं प्रेमी-माला में बिंध
प्यारी को ललचाऊं,
चाह नहीं सम्राटों के शव पर
हे हरि डाला जाऊं,
चाह नहीं देवों के सिर पर
चढूं भाग्य पर इठलाऊं,
मुझे तोड़ लेना बनमाली,
उस पथ पर देना तुम फेंक
मातृ-भूमि पर शीश- चढ़ाने,
जिस पथ पर जावें वीर अनेक

**संकलन**
अहिरे अजय
तृतीय  वर्ष विज्ञान

# ज्ञान का खजाना है

जिद्द है कि अब ज़माने को आधुनिक बनाना है
सही मायनों में विज्ञान ही ज्ञान का खजाना है

ज़िंदगी को जीने का अंदाज़ इसका पुराना है
सदियों से सदियों तक इसका सफर सुहाना है

नकारात्मकताओं को एक पल में ठुकराना है
विज्ञान की शक्ति से ही निराशाओं को झुकाना है

आशाओं के आसरे सफलता का हाथ उठाना है
ये कहना गलत नहीं कि विज्ञान ही ज्ञान का खजाना है

साहस के साथ इसकी संरचना को अपनाना है
निरंतर अनुसंधानों से जीवन का मोल चुकाना है

परिश्रम के दरिया में मिलकर गोते लगाना है
समस्याओं को आज समाधान का राह दिखाना है

उत्सुकता ही जिसका मूल ठिकाना है
वही विज्ञान, ज्ञान का सबसे बड़ा खजाना है...

**संकलन**
पवार पल्लवी
प्रथम वर्ष विज्ञान

# युवा शक्ति

ऋतुओं में जैसे बसंत की बहार है
साहस की जैसे धारदार तलवार है
जीवन यात्रा में है प्रयासरत निरंतर
युवा शक्ति के आगे नतमस्तक संसार है

असंख्य असफलताओं से टकराकर
निज सपनों को साहस से बचाकर
ले जाना है जरूरी श्रम की नौका को
निज ज़ख्मों पर जैसे मरहम लगाकर
सच्चे सपनों की उड़ान है
चेहरों पर खिली मुस्कान है
खुशियों की खोज में निरंतर
युवा शक्ति ही सत्य की पहचान है

जीकर जिनके किस्सों में
अमर होती कई कहानियां
आकर पीड़ाओं के हिस्सों में
जैसे पलती हैं कई कहानियां
वो कहानियां जो जीत का आगाज़ हैं
वो कहानियां जो साहसी आवाज़ हैं
युवा शक्ति हैं संघर्षरत निरंतर
वो कहानियां जो सुखों का एहसास हैं...

**संकलन**
प्रजापती पवन
तृतीय  वर्ष विज्ञान

# रंग बरस रहे हैं

नयन सुख की आस में लंबें समय से तरस रहे हैं
आशाओं की अंगड़ाई से होली पर रंग बरस रहे हैं

उमंग में उत्सव देखकर
होलिका दहन कर
गीत खुशियों के गाए जा रहें हैं
जयकारें धर्म की जय के लगाए जा रहे हैं
होली की आहट से हर कली चहक रहे हैं
रंगों की खुशबू से शहर की हर गली महक रहे हैं

ऋतुओं का बदलना ही उत्सव के समान है
होली के रंगों की भी अपनी अलग पहचान है
निराशाओं के छाती पर आशाएं चढ़ रही हैं
बाजारों में भी होली की चहल-पहल बढ़ रही है
भीगने को इनमें कई बार तरस रहे हैं
हर्षोल्लास के साथ हम पर होली के रंग बरस रहे हैं

**संकलन**
शाह श्वेता
प्रथम वर्ष विज्ञान

# English Poems

# The Road Not Taken

Two roads diverged in a yellow wood,

And sorry I could not travel both

And be one traveler, long I stood

And looked down one as far as I could

To where it bent in the undergrowth;

Then took the other, as just as fair,

And having perhaps the better claim,

Because it was grassy and wanted wear;

Though as for that the passing there

Had worn them really about the same,

And both that morning equally lay

In leaves no step had trodden black.

Oh, I kept the first for another day!

Yet knowing how way leads on to way,

I doubted if I should ever come back.

I shall be telling this with a sigh

Somewhere ages and ages hence:

Two roads diverged in a wood, and I—

I took the one less traveled by,

And that has made all the difference.

**संकलन**
शाह श्वेता
प्रथम वर्ष विज्ञान

# O Captain! My Captain!

O Captain! my Captain! our fearful trip is done,
The ship has weather'd every rack, the prize we sought is won,
The port is near, the bells I hear, the people all exulting,
While follow eyes the steady keel, the vessel grim and daring;
But O heart! heart! heart!
O the bleeding drops of red,
Where on the deck my Captain lies,
Fallen cold and dead.

O Captain! my Captain! rise up and hear the bells;
Rise up—for you the flag is flung—for you the bugle trills,
For you bouquets and ribbon'd wreaths—for you the shores a-crowding,
For you they call, the swaying mass, their eager faces turning;
Here Captain! dear father!
This arm beneath your head!
It is some dream that on the deck,
You've fallen cold and dead.

My Captain does not answer, his lips are pale and still,
My father does not feel my arm, he has no pulse nor will,
The ship is anchor'd safe and sound, its voyage closed and done,
From fearful trip the victor ship comes in with object won;
Exult O shores, and ring O bells!
But I with mournful tread,
Walk the deck my Captain lies,
Fallen cold and dead.

**संकलन**
जैन सोनम
तृतीय वर्ष विज्ञान

## Languages

I don't like French.Too many letters, not enough sound.
I don't like Russian.
Looks like alphabet soup, wherever it's found.
I don't like German.
Sounds like you're talking through a gag.
I don't like Italian.
For letter i's it does not lag.
You spend your hours in study at school.
Each noun and verb, each grammatical rule.
You stare at the book, you study and cram.
While not daydreaming, you train for exam.
Reflexive and infinitive, Masculine and feminine.
Each and every little word, every single tense it's in.
The pleasant, sunny days you miss.
The TV shows you must resist.
But when you take that trip,
And you disembark that ship;
Or when your plane comes down,
And you're in that foreign town,
You find the natives, old and young;
All can speak the English tongue.

**संकलन**
मंडलिक हर्षला
तृतीय  वर्ष विज्ञान

## Happy College Students

I see their confidence not over-assuming

But not too shy and timid their socialization sounds healthy

Not extreme nor conceited in character

A bit classy but not social climber

They have nice camaraderie and cool friendships

They have a sense of loyalty to their university

Proud to their Alma Mater with high spirit

They have a love-life, but serious in their studies

They are close with their classmates they have catchy

And elegant uniform and know how to handle and bring-up in their stance

Most of them are not hi-hat snobs

They have good and natural smiles

They have well-rounded school that enriches

And excel in all fields like sports, arts, and academics

They're enjoying their college lives

And will graduate as a happy and fulfilled student.

**संकलन**
वळवी आकाश
तृतीय वर्ष विज्ञान

## Congratulations

On this special day,

I would like to congratulateYou for a job well done.

I want to take this chance

To encourage you in whatever

You choose to do in the future.

On this graduation day,

You must look ahead and

Dream of all the bright possibilities

That your future holds for you.

Today and for the rest of

Your life... may all your dreams come true.

**संकलन**
पाडवी भाग्यश्री
तृतीय  वर्ष विज्ञान

# विद्यापीठ गीत

मंत्र असो हा एकच हृदयी" जीवन म्हणजे ज्ञान
ज्ञानामाधुनी मिळो मुक्ती अन मुक्तीमाधुनी ज्ञान
कला ज्ञान विज्ञान संस्कृती साधू पुरुषार्थ
साफस्थास्तच  सदा अंतरी पेटवू ज्ञान ज्योत
मंगल पावन चराचरातून श्रवते अक्षयगान
उत्तम विद्या परम शक्ती ही आमुची ध्येयासक्ती
शील एकता चारित्र्यावर सदैव औची भक्ती
सत्य शिवाचे मंदिर सुंदर विद्यापीठ महान
समता ममता स्वातंत्र्याचे नांदो जागी नाते
आत्मबलाने होऊ आम्ही आमुचे भाग्यविधाते
ज्ञानप्रभूची लाभो करुणा आणि पायसदान

**राजामहाजन**


**प्रकाशक – प्राचार्य डॉ. एम. जी. रघुवंशी**
आर. एफ.एन.एस. वरिष्ठ विज्ञान महाविद्यालय अक्कलकुवा जि. नंदुरबार
दूरध्वनी – ०२५६७ – २५२८२०
**Website – rfnnscienc.org.com**
**Email – seniorsienceakk@gmail.com**
**संपादक –प्रा. जी. के. सूर्यवंशी**